# भूमिका

गेली पन्नास वर्षे मराठी दलित कवितेचा सर्वांगीण अभ्यास होत असताना कवी राम दोतोंडे यांच्यासारख्या एक दर्जेदार दलित कवीच्या कवितेचा म्हणावा तितका अभ्यास झालेला नाही. त्यांचा पहिला काव्यसंग्रह 'रापी जेव्हा लेखणी बनते' वाङ्मयीन आणि सामाजिकदृष्ट्या उत्कृष्ट असतानाही त्याची दलित समिक्षकांनी म्हणावी तेवढी दखल घेतलेली दिसत नाही. त्याचबरोबर तब्बल बावीस वर्षांनी प्रकाशित झालेला 'गल्ली बदललेला मोर्चा' हा कवितासंग्रहही समिक्षकांच्या दृष्टिकोणातून उपेक्षितच राहिला. या सर्व गोष्टींचा विचार करून कवी राम दोतोंडे यांच्या दोन कवितासंग्रहांचा अभ्यास एम.फिल पदवीसाठी करावा आणि त्यांच्या काव्यलेखनाचे विशेष समाजशास्त्रीय तसेच वाङ्मचीन दृष्टिकोणातून जाणून घ्यावे या हेतूने वरील विषयाची निवड केली आहे.